''कृपया प्रसिध्दी कारता

पुणे महानगरपालिका
पाणीपुरवठा विभाग

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
१४/०७/२०२६

## प्रेस नोट

### नागरिकांसाठी महत्त्वाचे आवाहन

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये येणाऱ्या कच्च्या पाण्याच्या गढूळतेत लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः जुने पर्वती जलशुद्धीकरण केंद्रात येणाऱ्या पाण्याची गढूळता प्रकल्पाच्या निर्धारित शुद्धीकरण क्षमतेपेक्षा अधिक असल्याने ती पूर्णपणे नियंत्रित करणे सध्या शक्य होत नाही.

तथापि, जलशुद्धीकरण केंद्रातून वितरित करण्यात येणारे पाणी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया पूर्ण करून पूर्णपणे निर्जंतुकीकरण (Disinfection) करूनच नागरिकांना पुरविण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्यामध्ये कोणतेही रोगजनक जिवाणू राहणार नाहीत, यासाठी आवश्यक ती सर्व दक्षता पाणीपुरवठा विभागामार्फत घेतली जात आहे.

तरीही, सध्या पाण्याची गढूळता वाढलेली असल्याने नागरिकांनी अतिरिक्त खबरदारी म्हणून पिण्याचे पाणी काही काळ स्थिर ठेवून त्यामध्ये आवश्यकतेनुसार तुरटी (Alum) फिरवून गढूळ कण तळाशी बसू द्यावेत. त्यानंतर वरचे स्वच्छ पाणी स्वच्छ कापडाने किंवा योग्य फिल्टरद्वारे गाळून उकळूनच पिण्यासाठी वापरावे, असे आवाहन पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.

तसेच, सिंहगड रस्त्याकडील हद्दवाढीतील गावांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्यावर केवळ निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया केली जाते. त्या भागात जलशुद्धीकरण (फिल्टर) प्रकल्प उपलब्ध नसल्यामुळे संबंधित नागरिकांनी पिण्याचे पाणी आवश्यकतेनुसार तुरटीचा वापर करून गढूळता कमी करावी, त्यानंतर ते गाळून व उकळूनच वापरावे, असेही आवाहन करण्यात येत आहे.

तरी सर्व नागरिकांनी याबाबत नोंद घेऊन सहकार्य करावे ही विनंती.
कळावे,

(नंदकिशोर जगताप)
मुख्य अभियंता
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका